डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे.
(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
barti
२८ क्वीन्स् गार्डन, जुन्या सर्किट हाऊसजवळ, पुणे-४११ ००१. दूरध्वनी क्र. : ०२०-२६३४ ३६००/२६३३ ३३३०
● E-mail : directorbarti@gmail.com ● Website : https://barti.maharashtra.gov.in ● फॅक्स :०२०-२६३३ ३५९६

जा.क्र. बार्टी/UPSC/२०२२-२३/ ३४९१

दिनांक- ३०/०६/२०२२

# घोषणापत्र

**बार्टी मार्फत एकूण १८० उमेदवारांना सहा महसूल विभागातील नामवंत कोचिंग संस्थेमार्फत यु.पी.एस.सी. नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांना संघ लोकसेवा आयोग-नागरी सेवा परीक्षेच्या पूर्वतयारी प्रशिक्षणाकरिता महाराष्ट्रातील सहा प्रशासकीय विभागातील खाजगी कोचिंग इन्स्टिट्यूटमध्ये प्रती महसूल विभाग ३० याप्रमाणे एकूण १८० विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणाकरिता पुढील प्रशिक्षण संस्थेमधून यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षेचे प्रशिक्षण देण्यात येईल.

| अ.क्र. | महसूल विभाग | संस्थेचे नाव | क्लासनिहाय विद्यार्थी संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे | UPSC Academia, Pune | ३० |
| २ | मुंबई | Spectrum Academy, Thane | ३० |
| ३ | नाशिक | Spectrum Academy, Nasik | ३० |
| ४ | औरंगाबाद | Spectrum Academy, Aurangabad | ३० |
| ५ | अमरावती | Shri Shetkari Shikshan Sanstha, Amravati | ३० |
| ६ | नागपूर | Siddharth Gautam Shikshan Samiti, Nagpur | १५ |
| | | Premier Academy Society, Nagpur | १५ |
| | | **एकूण** | **१८०** |

## लाभाचे स्वरूप

**प्रशिक्षणाकरिता निवड केलेल्या उमेदवारांना पुढील सुविधा/ लाभ देण्यात येतील-**

१. बार्टी संस्थेमार्फत प्रशिक्षण संस्थेला प्रशिक्षण शुल्क अदा करण्यात येईल.
२. विद्यावेतन- प्रती माह रक्कम रु. ९०००/-.

**पात्रता:**

- महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जातीचा उमेदवार असावा.
- उमेदवार पदवी परीक्षा उत्तीर्ण असावा.
- उमेदवाराचे वय दि. १ ऑगस्ट २०२२ रोजी २१ ते ३७ वर्षापर्यंत असावे.
- तसेच उमेदवार संघ लोकसेवा आयोग -नागरी सेवा परीक्षा- २०२३ परीक्षेस पात्र असावा.

महत्त्वाची टिप –

- दिल्ली येथील ३०० उमेदवारांच्या प्रशिक्षणासाठी निवड चाळणी परीक्षा **BARTI-UPSC-CET-2023** करिता ऑनलाईन अर्ज मागविले आहेत. **या घोषणापत्रकाद्वारे घोषित करण्यात येते की, दिल्ली येथील प्रशिक्षणाकरिता ३०० उमेदवारांची व सहा महसूल विभागातील प्रशिक्षणाकरिता १८० उमेदवारांची, अशाप्रकारे एकूण ४८० उमेदवारांची निवड करण्यासाठी एकच सामाईक परीक्षा घेण्यात येईल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**
- **ज्या उमेदवारांना सहा महसूल विभागातील प्रशिक्षणाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी BARTI-UPSC-CET-2023 या परीक्षेसाठी प्रसिद्ध केलेला ऑनलाईन अर्ज भरावा.** पात्र उमेदवारांना https://barti.maharashtra.gov.in >Notice Board > BARTI-UPSC-CET-2023>APPLY ONLINE या वेबसाईट ऑनलाईन अर्ज उपलब्ध करून दिला आहे.
- **सहा महसूल विभागातील यु.पी.एस.सी.- नागरी सेवा परीक्षा प्रशिक्षणाचा लाभ घेता यावा, यासाठी BARTI-UPSC-CET-2023 या निवड चाळणी परीक्षेकरिता अर्ज करण्याचा अंतिम दिनांकामध्ये दि. १० जुलै २०२२ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.**
- **निवड चाळणी परीक्षेतील प्राप्त गुणांनुसार व उमेदवारांच्या पसंतीक्रमानुसार विद्यार्थ्यांना दिल्ली अथवा सहा महसूल विभागातील प्रशिक्षण संस्थेमध्ये प्रायोजित करण्यात येईल.**
- **ज्या उमेदवारांनी यापूर्वी ऑनलाईन अर्ज सादर केला आहे, त्यांनी पुन्हा ऑनलाईन अर्ज सादर करू नये.**

परीक्षेच्या दिनांकाबाबत स्वतंत्रपणे घोषणापत्राद्वारे कळविण्यात येईल, यासाठी उमेदवारांनी बार्टी संकेतस्थळास वेळोवेळी भेट द्यावी. अधिकाधिक उमेदवारांनी सदर प्रशिक्षणाकरिता अर्ज सादर करावेत असे आवाहन याद्वारे करण्यात येत आहे.

(उमेश सोनवणे)
उपायुक्त तथा विभाग प्रमुख
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन
व प्रशिक्षण संस्था, बार्टी, पुणे